# उषा खन्ना - भाग १



यश हे वाईट शिक्षकासारखे असते असे म्हणतात. आता हेच बघा ना की एखाद्या संगीतकाराने - त्याने किंवा तिने - आपल्या पदार्पणाच्या पहिल्याच चित्रपटात अतिशय सुंदर संगीत देऊन अवघ्या चित्रपटसृष्टीत खळबळ उडवून दिली परंतु त्यानंतरच्या कारकीर्दीत संगीताचा तोच दर्जा टिकवणे कठीण झाले असे उदाहरण सापडणे कठीणच! परंतु अपवाद म्हणून केवळ उषा खन्नाचेच नाव द्यावे लागेल. दुर्दैवाने ह्या बाबतीत ती एकमेव संगीतकार म्हणावी लागेल. तिच्या 'दिल देके देखो' या पहिल्या चित्रपटात एकंदर १० गाणी होती आणि ती दहाही गाणी केवळ अवर्णनीय अशीच सुंदर होती. अवघ्या सोळा वर्षांच्या (१९५९ साली) या मुलीने अशी सुरेल अफलातून गाणी कशी काय केली हेच खरे तर पहिले कोडे आहे आणि त्यानंतरच्या चित्रपटांत ह्या गाण्यांच्या जवळपासही जातील अशी गाणी करण्यात ती असमर्थ का ठरली हे दुसरे कोडे आहे. कित्येक रसिक प्रेक्षकांनी 'दिल देके देखो' हा चित्रपट केवळ कथा/अभिनय पाहण्यासाठी नाही तर त्यातील दिलखेचक, श्रवणीय गाण्यांचा आस्वाद घेण्यासाठी वारंवार पाहिला. ती सुमधुर गाणी पुढीलप्रमाणे आहेत :

’दिल देके देखो’ (रफी)
’मेघा रे बोले घनन घनन’ (रफी आणि कोरस)
’दो एकम दो, दो दुनी चार’ (रफी आणि आशा)
’बोलो बोलो, प्यार हो तो कहदो येस’ (रफी)
’हम और तुम और ये समा’ (रफी)
’प्यार की कसम है’ (रफी आणि आशा)
’कौन ये आया मेहफिल मे’ (रफी, उषा खन्ना, कोरस)
’यार चुलबुला है, हसीन दिलरुबा है’ (रफी आणि आशा)
’बडे है दिल के काले हा यही’ (रफी आणि आशा)

ही गाणी तुम्ही पुन्हा पुन्हा ऐकलीत तर तुमच्या लक्षात येईल की गोड चालीत आणि श्रवणीय संगीताच्या साथीने अशी सुरेल गाणी परत रचणे किती कठीण तर आहेच पण तेही एकाच चित्रपटामध्ये एकामागून एक अशा स्वरूपात ! पहाटपूर्वेचा परिणाम साधणारे 'हम और तुम और ये समा' ह्या रफीच्या एकल गीताला अ‍ॅकॉर्डियनच्या साथीने मँडोलिनमुळे रंगत आली आहे. नैनितालच्या रस्त्यावर धुक्यात गुरफटलेला फक्त आणि फक्त प्रेमानुभव 'राही मिल गये राहोंमे' या गाण्यातून व्यक्त होतो. इथे व्हायोलिन गार वाऱ्यांची अनुभूति देतात तर तालवाद्ये उत्साहवर्धक हवेचा अनुभव देतात. 'मेघा रे बोले' या गाण्यातील कोरसचा वापर फारच छान आहे. 'दिल देके देखो'च्या गाण्यांनी आजही अचंबित व्हायला होतं आणि ती यशस्वी करण्यात सहभागी असलेल्या सर्वांना भारावून गेल्यासारखं होतं. ते लोक म्हणजे मजरुह, रफी, आशा, निर्माते एस्. मुखर्जी आणि दिग्दर्शक नासिर हुसेन हे होत. त्यामध्ये शम्मी कपूर सुध्दा, तसेच नव्याने संधी मिळालेली आशा पारेख आणि अर्थातच स्वत: उषा खन्ना देखील !

हे यश केवळ गाण्यांच्या चाली आणि ऑर्केस्ट्रेशनचे नियोजन यापुरतेच मर्यादित नाही तर ह्यामधील पाश्चिमात्य पार्श्वसंगीताचा केलेला वापरही महत्त्वाचा आहे. उदा. आशा पारेख झोपेत कुशीवर वळते आणि स्वप्नात मंद लयीत नाचणारा, मदभऱ्या नजरेने पाहणारा देखणा शम्मी कपूर चित्त वेधून घेत असताना असहाय झालेली नायिका अशा पार्श्वसंगीतामुळे आणखीच खुलून दिसते. वास्ती आणि सिधू या खलनायकांच्या संवादांच्या दरम्यान संगीताच्या आधारे उषाने चित्रपटाच्या कथानकाला उभारी आणली आहे.

ह्यापूर्वी शम्मी कपूर असलेल्या 'तुमसा नही देखा' (१९५७) ह्या चित्रपटात नासिर हुसेन आणि एस्. मुखर्जी यांनी ओ. पी. नय्यर यांना संगीतकार म्हणून घेतले होते आणि त्या चित्रपटाने अपूर्व यश मिळवून दिले होते. परंतु बहुधा निर्माता आणि दिग्दर्शक यांचे संगीतकाराबरोबर थोडेफार बिनसले आणि त्यामुळे उषा खन्ना यांनी जेव्हा आपली गाणी सादर करण्याची तयारी दाखवली तेव्हा ती ऐकून घ्यायला एस्. मुखर्जी यांची ना नव्हती. करार लगेचच झाला आणि मग लवकरच इतिहास घडला.

या ऐतिहासिक कारकिर्दीच्या सुरुवातीला एस्. मुखर्जी यांनीच परत उषा खन्नांना 'हम हिंदुस्तानी' चे संगीत दिग्दर्शन दिले. 'छोडो कल की बाते' (कोरसबरोबर मुकेश), 'रात निखरी हुई' (मुकेश), सुमधुर 'हम जब चले तो, ये जहाँ झूमे' (कोरसबरोबर रफी) आणि 'माँझी मेरी किस्मत के, जी चाहे जहा ले चल' (लता) हे सुंदर गाणे; ही सर्व गाणी 'हम हिंदुस्तानी' मधली.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com